PNA/HSG/467/68

# श्रीराम ज्योती सहकारी गृहरचना संस्था. मर्यादित.

२०/४८, गुळवणी महाराज रस्ता, एरंडवणे, पुणे - ४११००४

दि. ०१/०२/२०२५

## विशेष सर्वसाधारण सभेची नोटीस

प्रति,

**सन्माननीय सभासद,**

सस्नेह नमस्कार,

संस्थेची विशेष सर्वसाधारण सभा रविवार दिनांक **१६ फेब्रुवारी २०२५** रोजी **सकाळी १०:३०** वाजता **'राधिका बंगला', पटवर्धन बाग, पुणे** ४११००४ येथे आयोजित केली आहे. तरी सर्व सभासदांनी वेळेवर उपस्थित रहावे ही विनंती.

### – सभेपुढील विषय –

**विषय क्र. १ :** मा. अध्यक्षांना सभेचे अध्यक्षस्थान स्वीकारण्याबाबत विनंती करणे.

**विषय क्र.२ :** संस्थेने नियुक्त केलेले प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार (PMC) आर्किटेक्ट हर्षल कवडीकर यांनी तयार केलेल्या फिजिबिलिटी अहवालाला मान्यता देणे.

**विषय क्र.३ :** संस्थेने नियुक्त केलेले प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार (PMC) आर्किटेक्ट हर्षल कवडीकर यांनी संस्थेच्या इमारतींच्या पुनर्विकसनासंबंधी तयार केलेले निविदा पत्र (Tender Document) तसेच संपूर्ण निविदा प्रक्रियेला (Tender Process) मान्यता देणे.

विषय क्र. ४ : पुणे महानगरपालिकेने मंजूर केलेला नकाशा व संस्थेच्या वास्तुविशारद यांनी दिलेल्या सदनिका / दुकाने मोजणी तक्ता (Area Table of Flat / Shop) यास मान्यता देणे.

सदर सभा विशेष सर्वसाधारण सभा असल्यामुळे सभेच्या दिवशी नमूद केलेल्या ठिकाणी व वेळी गणपूर्ती आवश्यक आहे. गणपूर्ती अभावी सभा तहकूब करावी लागल्यास सदर सभेचे कामकाज ७ दिवसांनी त्याच ठिकाणी करण्यात येईल. तहकुबीनंतर झालेल्या सभेत गणपूर्ती झाली नसल्यास मूळ सभेच्या कार्यक्रम पत्रिकेवर असलेले कामकाज पार पाडले जाईल. सदर सभेत होणारे कामकाज कायदेशीर असेल व घेतले जाणारे निर्णय सर्व सभासदांवर बंधनकारक राहतील याची सर्व सभासदांनी नोंद घ्यावी.

सदर सभेमध्ये अत्यंत महत्वाच्या विषयांवर चर्चा करून ठराव पारित करण्यात येणार असल्यामुळे सर्व सभासदांनी वेळेवर सभेला उपस्थित रहावे ही नम्र विनंती तसेच ही विशेष सर्वसाधारण सभा असल्यामुळे सदर सभेत होणाऱ्या चर्चेत व मतदान प्रक्रियेत फक्त सभासद अथवा सहसभासद (सभासद गैरहजर असतील तर) यांनाच भाग घेता येईल याची सर्व सभासदांनी नोंद घ्यावी.

| | |
|---|---|
| **शशांक गाजरे** | **गोपाळ कुलकर्णी** |
| अध्यक्ष | **सचिव** |